# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण **P.S.(ठाणे):** इगतपूरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0094 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 28/04/2026 03:21

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिंनाक पासून):** 23/03/2026
   **Date To ( दिंनाक पर्यंत):** 27/04/2026
   **Time From (वेळेपासून):** 15:32 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:53 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 28/04/2026 **Time (वेळ):** 01:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 28/04/2026 02:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हा परिषद इवदउपविभाग क,ता इगतपुरी, जि नाशिक

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सरकारतर्फे रुपाली रामू खांडवी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक,इगतपूरी,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक,इगतपूरी,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8379961020

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सतिश साहेबराव दराडे | | पालक का नाम : साहेबराव दराडे | 1. रा मल्हार बंगला, जय मल्हारनगर,मखमलाबाद, नाशिक,इगतपूरी,नाशिक ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | सागर सतिश रावले | | पालक का नाम : सतिश रावले | 1. MF 31सुदरबन कालनी, लेखानगर,सिडको नाशिक , इगतपूरी,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |



Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | रविंद्र रामनाथ गायकवाड | | पालक का नाम : रामनाथ गायकवाड | 1. फ्लॅट नं 19, विश्वेदु नगर, सिध्दीविनायक हाईटस्,चांदशी, नाशिक,इगतपूरी,नाशिक ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम रोख 6000/ रुपये | 6,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

6,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिंयाद इगतपुरी पोलीस स्टेशन, नाशिक (ग्रा.)

दिंनाक- 28.04.2026.

मी रुपाली रामु खांडवी, वय- 39 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक.

सरकार तर्फे फिंयाद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे 08 महिन्यापासून कार्यरत आहे.दि. 23.03.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतानां तक्रारदार श्री. रोशन विष्णु जाधव यांनी ला.प्र.विभाग, नाशिक कार्यालयातील आमचे कक्षात येवुन आमची भेट घेवुन त्यांचेकडे जिल्हा परिषद (इ.व.द.), उपविभाग, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील सहायक अभियंता श्री. सतिश दराडे व स्थापत्य अभियात्रिकी सहायक रावले यांनी त्यांचेकडे लाचेची मागणी केल्याचे आम्हांस सांगितले. तेव्हा त्यांची सविस्तर तक्रार ऐकुन घेतली व त्याबाबत आम्ही मा. पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, नाशिक यांना माहिती देवुन तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी करणेकरीता मा. नगर भुमापन अधिकारी, नाशिक यांना पत्र देवुन त्यांचेकडील श्री. सतिश सुनिल आरोटे, परिरक्षण भुमापन व श्री. सखाराम लक्ष्मण जाधव, दप्तरबंद यांना पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचाची ओळख करुन घेवुन त्यांना आमचे कक्षात हजर असलेले तक्रारदार रोशन विष्णु जाधव, पो.हवा. संदिप वणवे व पो.कॉ. प्रमोद पाळदे यांची ओळख करुन दिली.त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पंचासमक्ष त्यांच्या तक्रारीची हकिगत कथन करण्यास सांगुन त्यांची तक्रार त्यांना लिहुन देण्यास सांगितली पुढीलप्रमाणे'' मी सुशिक्षीत बेरोजगार अभियंता म्हणुन बांधकाम (इ.व.द.) विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडुन सन 2021 -2022 मध्ये नोंदणी क्र. 390 प्रमाणे ठेकेदारीचा परवाना घेतलेला आहे. मला 14 व्या वित्त आयोगाअंतर्गत ग्रामपंचायत, पिंपळगाव मोर, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील 04 विकास कामाची निविदा मंजुर होवुन सदर कामाचा 21.11.2025 रोजी ग्रामपंचायत अधिकारी व प्रशासक, ग्रामपंचायत पिंपळगाव मोर यांचेकडुन कार्यारंभ आदेश मिळाला आहे. त्या कामापैकी जगन काळे ते भंडारदरा रोड सिमेंट कॉक्रीट रस्ता तयार करण्याचे 2,99,970/-रुपयाचे काम व बोरीचीवाडी विहरीकडे जाणार रस्ता हे 2,99,970/-रुपयाचे काम मी मुदतीत पुर्ण केले आहे. मी पुर्ण केलेल्या कामाचे सहायक अभियंता श्री. सतिश दराडे यांनी जागेवर मोजमाप करुन कामाच्या मुल्यांकनांची मोजमाप पुस्तिकेत ना◌ो◌ंद घेतली आहे. त्यानंतर मी दि. 18.03.2026 रोजी स्थापत्य अभियात्रिकी सहायक श्री. सागर रावले यांना त्यांच्या मोबाईलवर फोन करुन त्यांना मी केलेल्या कामच्या बिंलाबाबत विचारणा केली असता, त्यांनी मला माझे व्हॉटसअँपवर नाशिक येथील इंदिरानगरचे लोकेशन पाठवुन त्या



Scanned with CamScanner

लोकेशनवर मला भेटण्यास बोलाविले. त्याप्रमाणे मी इंदिरानगर येथे जावुन स्थापत्य अभियांत्रिकी सहायक श्री. सागर रावले यांची भेट घेतली असता, त्यांनी मला ''तुम्ही केलेल्या 1,50,000/-रु व 3,00,000/- रुपयांच्या कामाचे एकुण 4,50,000/-रुपयांचे बिल अदा करण्यासाठी सहायक अभियंता सतिश दराडे यांना 2 टक्क्यांप्रमाणे 9,000 /-रु दयावे लागतील त्याशिवाय ते मोजमाप पुस्तिकेवर सही करणार नाहीत.'' असे सांगुन त्यांनी मला सहायक अभियंता श्री. दराडे यांच्याशी मोबाईलवर बोलुन घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझे मोबाईलवरुन दराडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी मला ''स्थापत्य अभियांत्रिकी सहायक रावले यांनी सांगितल्याप्रमाणे पैसे त्याचेकडे दया. मी मोजमाप पुस्तिकेवर सही करुन देतो.'' असे सांगितले. अशी सहायक अभियंता दराडे व स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सागर रावले यांनी माझेकडे लाचेची मागणी केली आहेमला त्याच्या सांगण्याप्रमाणे लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नाही. परंतु त्यांना पैसे दिले नाही तर ते मला बिल अदा करण्यास विंलब करतील. माझा त्यांच्याशी कोणताही वाद नसुन त्यांच्याशी उसनवारीचा अथवा इतर आर्थिक व्यवहार नाही. मी आज दि. 23.03.2026 रोजी स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सागर रावले व सहायक अभियंता सतिश दराडे यांची भेट घेण्यासाठी जिल्हा परिषद (इ.व.द.), उपविभाग, ता. इगतपुरी कार्यालयात जाणार आहे. तेव्हा त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर आपले विभागामाफत कारवाई होणेस विंनती आहे.'' सदर तक्रार आम्ही व पंचानी वाचुन पाहीली ती तक्रारदार यांनी तक्रारीची सांगितलेली तोंडी हकिगत व लिहुन दिलेली लेखी तक्रार यामधील मजकुर सारखाच असल्याने तक्रारीवर व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रावर आम्ही व पंचानी सहया केल्या आहेत. त्यानंतर आम्ही, पंच व स्टाफ असे खाजगी कार क्रं. एम.एच.15, जे.एच. 1967 ने व तक्रारदार हे त्यांचे दुचाकीने ला.प्र.विभाग, नाशिक कार्यालयातुन रवाना होवुन इगतपुरी येथे तक्रारदार यांचे ओळखीचे श्री बारकु चिमा माळी यांचे दत्तनगर, गिरणारे येथील घरी थांबलो. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना पडताळणी कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना देवुन आमचे सुचनेवरुन पोहवा/संदिप वणवे यांनी तक्रारदार यांच्याकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांना पंच नं. 01 सतिश आरोटे यांचेसह तक्रारदार यांचे दुचाकी क्रं. एम.एच.15, के.जे. 2006 ने सहायक अभियंता सतिश दराडे व स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सागर रावले यांची भेट घेण्यासाठी जिल्हा परिषद (इ.व.द.), उपविभाग, ता. इगतपुरी कार्यालयात रवाना केले. त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार व पंच नं. 01 आरोटे हे आमचेजवळ परत आले तेव्हा आमचे सुचनेवरुन पो.हवा. संदिप वणवे यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार व पंच नं. 01 यांना सहायक अभियंता सतिश दराडे व स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सागर रावले यांची भेट घेण्यास रवाना केल्यापासुन ते भेट घेवुन परत येईपावेतोची हकिगत विचारली असता, त्यांनी पंच नं. 01 व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या दुचाकीने आपल्यापासुन रवाना होवुन जिल्हा परिषद (इ.व.द.), उपविभाग, ता. इगतपुरी कार्यालयात गेलो. तेव्हा तक्रारदार यांनी स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सागर रावले यांची भेट घेतली. तेव्हा त्यांच्यात तक्रारदार यांच्या प्रलंबित बिलाच्या कामाबाबत चर्चा झाली चर्चदरम्यान तक्रारदार यांनी रावले यांना एम.बी. मागितली. तेव्हा रावले यांनी साहेबांच्या सहीकरीता ठेवली असल्याचे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी साहेबाचं ठरल्याप्रमाणे किती होतात साहेबाना किती पैसे दयावे लागतील? अशी त्यांना विचारणा केली असता, सागर रावले यांनी तक्रारदार यांना 2 टक्याप्रमाणे 9,000/-रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडुन 6,000/-रु लाचेची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी रावले यांना पैसे तुमच्याकडे दयायचे का? बाबत विचारणा केली असता, त्यांनी मान हालवुन होकार दिला. तसेच 2 टक्यांप्रमाणे 6,000/-रु लाच स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर तक्रारदार यांनी माझे समक्ष स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सागर रावळे यांचे समवेत सहायक अभियंता सतिश दराडे यांची त्यांच्या कक्षात भेट घेतली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याशी त्यांचे प्रलंबित बिला बाबत चर्चा केली. तेव्हा तक्रारदार यांनी सागर रावले यांनी सांगितल्याप्रमाणे सहायक अभियंता दराडे यांना सांगितले. तेव्हा दराडे यांनी त्यांच्या कारची चावी देवुन कारमध्ये ठेवलेले नोटबुक (मोजमाप पुस्तिका/एम.बी.) आणण्यास सांगितले. दरम्यान तक्रारदार यांनी गाडीतुन 02 नोटबुक (मोजमाप पुस्तिका/एम.बी.) आणुन सहायक अभियंता दराडे यांच्याकडे दिल्या. तेव्हा दराडे यांनी त्या दोन्ही मोजमाप पुस्तिकेवर सही करुन तक्रारदार यांचेकडे त्यामोजमाप पुस्तिका देवुन तक्रारदार यांना एकाच कामाच्या बिंलाचे पैसे देण्यास सांगुन त्यांच्या दोन्ही हातांची सहा बोटे तक्रारदार यांना दाखवुन सहा हजार रुपये देण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी सहायक अभियंता दराडे यांना एकाच बिलाचे देवु ना? असे सांगितले असता, त्यांस त्यांनी होकार दिला.'' अशी हकिगत कथन केली.त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉडमधील व्हाईस रेकॉर्डमधील तक्रारदार, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सागर रावले व सहायक अभियंता सतिश दराडे यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकुन आमची व पंचाची तक्रारदार यांचेकडे स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सागर रावले यांनी 9,000/-रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सागर रावले व सहायक अभियंता सतिश दराडे यांनी तक्रारदार यांचेकडुन 6,000/-रु लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे आमची खात्री झाली. त्यानंतर



Scanned with CamScanner

आम्ही ला.प्र.विभाग नाशिक कार्यालयात परत येवुन दि. 23.03.2026 रोजी तक्रारदार यांचे तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला. त्यानंतर आज दि. 31.03.2026 रोजी आम्ही दिलेल्या सुचनेवरुन तक्रारदार व पंच ला.प्र.विभाग कार्यालयात आमचे कक्षात हजर झाले. तेव्हा तक्रारदार यांच्याशी स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सागर रावले यांचेवर सापळा लावणेबाबत चर्चा केली. त्यादरम्यान तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलचा स्पिकर सुरु करुन स्थापत्य अभियांत्रिकी सहायक रावले यांना त्यांचे मोबाईलवर फोन लावला असता, रावले यांनी ते साईटवर असल्याचे सांगुन त्यांचेत तक्रारदार यांचे बिलाबाबत चर्चा झाली. तेव्हा अभियांत्रिकी सहायक रावले यांनी 'तुम्ही साहेबांना भेटुन घ्या. तुमचे तुम्ही करुन घ्या.' तक्रारदार यांना सांगितले. तसेच सहायक अभियंता सतिश दराडे कोठे आहेत याबाबत त्यांना माहिती नसल्याचे सांगितल्याने सदर दिवशी सापळा कार्यवाही स्थगित करण्यात आली. तसा सविस्तर सापळा स्थगिती पंचनामा करण्यात आला आहे.आज दि. 27.04.2026 आम्ही पंच सतीश सुनिल आरोटे व पंच सखाराम लक्ष्मण जाधव यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही पंचाना सांगितले की, तक्रारदार रोशन विष्णु जाधव यांनी आम्हांस फोन करुन ते काही दिवस त्यांच्या खाजगी कामात व्यस्त असल्याने सापळा कारवाई कामी येवु शकले नसल्याचे सांगुन त्यांनी लोकसेवक सहायक अभियंता सतिश दराडे व स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सागर रावले हे आजरोजी कार्यालयात येणार असलेबाबत त्यांना माहिती मिळाली असुन आजरोजी त्यांचेवर सापळा कारवाईचे आयोजन करा असे सांगितले असल्याचे सांगुन तक्रारदार हे इगतपुरी येथे भेटणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही, पंच व स्टाफ असे शासकीय वाहन क्रं. एम.एच.15, जे.एस. 3186 ने ला.प्र.विभाग, नाशिक कार्यालयातुन रवाना होवुन इगतपुरी येथे तक्रारदार यांचे ओळखीचे श्री बारकु चिमा माळी यांचे दत्तनगर, गिरणारे येथील आलो. तेथे तक्रारदार हजर असुन तक्रारदार यांनी सापळा कारवाईकामी दिलेल्या 6,000/-रु त्यांत 500/-रु दराच्या 12 नोटांना आमचे सुचनेवरुन पो.हवा. अविनाश पवार यांनी तक्रारदार व पंचाना अँथ्रॉसिन पावडर लावण्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवून सदर लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवून दिली. त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंचाना सापळा कारवाईबाबत सविस्तर सुचना दिल्यात त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोहवा वणवे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचेकडे देवून तक्रारदार व पंच नं. 01 आरोटे यांना सहायक अभियंता सतिश दराडे व सापत्य अभियांत्रिकी सहायक सागर रावले यांची भेट घेण्यासाठी जिल्हा परिषद (इ.व.द.), उपविभाग, ता. इगतपुरी कार्यालयात तक्रारदार यांच्या दुचाकी एम.एच.15, के.जे. 2006 ने रवाना केले. त्यांच्या पाठोपाठ आम्ही, पंच नं. 02 जाधव व सापळा पथक असे शासकीय वाहनाने रवाना होवून जिल्हा परिशद (इ.व.द.), उपविभाग, ता. इगतपुरी कार्यालयाच्या आजुबाजुस सापळा लावला. त्यानंतर तक्रारदार यांनी ठरवुन दिलेला इशारा केल्यावर आम्ही, पंच नं. 02 जाधव व सापळा पथक असे तक्रारदार यांचेजवळ पोहचलो. .less-history-file: तेव्हा आमचे सुचनेवरुन पो.हवा. वणवे यांनी तक्रारदार यांचेकडील डीजीटल व्हाईस रेकॉर्ड काढुन बंद केले. तेव्हा आम्ही तक्रारदार व पंच नं. 01 सतिष आरोटे यांना विचारणा केली असता, '' मी व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या दुचाकी वाहनाने आपल्यापासुन रवाना होवुन जिल्हा परिषद (इ.व.द.), उपविभाग, ता. इगतपुरी कार्यालयात पोहोचलो. तेथे तक्रारदार यांनी सहायक अभियंता सतिश दराडे यांची भेट घेतली तेव्हा त्यांच्यात तक्रारदार यांच्या कामाबाबत चर्चा झाली. चर्चेदरम्यान तक्रारदार यांनी त्यांच्याकडील मोजमाप पुस्तके सहायक अभियंता सतिश दराडे यांच्याकडे दिली. तेव्हा त्यांनी हाताच्या इशा-याने तक्रारदार यांना पैशांचा इशारा केला. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या खिशातील लाचेची रक्कम त्यांना देण्याकरीता बाहेर काढली असता, सहायक अभियंता सतिश दराडे यांनी सदर तक्रारदार यांना सदर लाचेची रक्कम त्यांच्या टेबलचे ड्रॉवरमध्ये टाकण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी लाचेची रक्कम टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवली.'' असल्याची हकीगत सांगितली. तेव्हा आम्ही पंच नं. 02 यांना ड्रॉवरमधील लाचेची रक्कम ताब्यात घेण्यास सांगिले असता ड्रॉवरमध्ये लाचेची रक्कम दिसुन आली नाही. तेव्हा आम्ही सहायक अभियंता सतिश दराडे यांना लाचेची रक्कम कोठे आहे? याबाबत विचारणा केली असता, त्यांनी ड्रॉवरमधुन लाचेची रक्कम काढुन समोरच उभे असलेल्या रविंद्र रामनाथ गायकवाड यांच्याकडे दिली असल्याचे सांगितले. तेव्हा आम्ही लोकसेवक सहायक अभियंता सतिश दराडे व लोकसेवक कनिष्ठ सहायक रविंद्र गायकवाड यांना आमची ओळख दिली. त्यानंतर आम्ही पो.हवा. वणवे यांना सहायक अभियंता दराडे यांचे व पो.हवा. पवार यांना कनिश्ठ सहायक रविंद्र गायकवाड यांचे दोन्ही हात मनगटापासुन धरुन त्यांना अटकांवुन ठेवण्यास सांगितले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच नं. 02 जाधव यांनी लोकसेवक रविंद्र गायकवाड यांनी लोकसेवक दराडे यांचेकडुन तक्रारदार यांनी दिलेली लाचेची रक्कम स्विकारलेली डाव्या मागील खिशात ठेवलेली लाचेची रक्कम ताब्यात घेवुन ती मोजुन पाहिली असता त्यामध्ये 6,000/-रु त्यात 500/-रु दराच्या 12 चलनी नोटा मिळुन आल्या. सदर नोटाच्या क्रमांकाशी सापळापुर्व कार्यवाही दरम्यान कागदावर लिहीलेल्या नोटाच्या क्रमांकाशी पडताळणी केली असता, सदर नोटाचे क्रमांक एकच असल्याची पंचाची



Scanned with CamScanner

खात्री झाली. सदरच्या नोटा आम्ही पंच नं. 02 यांना त्यांचेकडे ठेवण्यास सांगितल्या त्यानंतर आम्ही पुढील संपुर्ण कार्यवाही शासकीय विंश्रामगृह, इगतपुरी येथे जावुन करण्याचा निणय घेतला. त्यानंतर आम्ही, पंच, लोकसेवक दराडे, लोकसेवक रविंद्र गायकवाड व सापळा पथक असे शासकीय वाहनाने व तक्रारदार त्यांच्या दुचाकी वाहनाने तेथुन रवाना होवुन शासकीय विंश्रामगृह, इगतपुरी येथे आलो. त्यानंतर आम्ही वाचक पो.नि. श्री स्वप्निल राजपुत यांना फोन करुन सदर कारवाईतील लोकसेवक सागर सतिश रावले, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांना ताब्यात घेणेबाबत सांगितले. दरम्यान लोकसेवक सागर रावले यांना शासकीय विश्रामगृह, इगतपुरी येथे आणुन आमच्या ताब्यात दिले. तेथे आजरोजी झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा घटनाक्रमाप्रमाणे सविस्तर पंचनामा केला आहे. अशाप्रकारे दि. 23.03.2026 रोजी लोकसेवक अभियांत्रिकी सहायक सागर रावले यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांनी ग्रामपचायंत मौजे पिंपळगाव मोर, ता. इगतपुरी येथे केलेल्या कामाच्या मोजमाप पुस्तिकेवर सही करण्यासाठी उपअभियंता सतिश दराडे यांना 2 टक्यांप्रमाणे 9,000/-रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 6,000/-रु स्विकारण्याचे मान्य केले तसेच उपअभियता सतिश दराडे यांनी बिलावर सही करुन देवुन तक्रारदार यांना एकाच बिलाचे पैसे देण्यास सांगुन लाच स्विकारण्याचे मान्य करुन सदर लाचेची रक्कम लोकसेवक सतिश दराडे यांनी दि. 27.04.2026 रोजी 13/53 वा. तक्रारदार यांचेकडुन जिल्हा परिषद (इ.व.द.), उपविभाग, इगतपुरी, जि. नाशिक येथे 6,000/-रु लाचेची रक्कम त्यांच्या कार्यालयातील टेबलच्या ड्राव्हरमधुन काढुन लोकसेवक सतिश दराडे यांनी स्विकारुन ती लाचेची रक्कम लोकसेवक रविंद्र गायकवाड, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांच्याकडे दिली. लोकसेवक सतिश दराडे, लोकसेवक सागर रावले व लोकसेवक रविंद्र गायकवाड यांनी त्यांचे पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वतःचा आर्थिक फायदयासाठी सदर लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम सन 1988 चे कलम 7, 12 प्रमाणे माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिंयाद आहे.

समक्ष

हि फिंयाद दिली.
दि. 28.04.2026

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sarika vithaal ahirrao(I (Inspector)) / 11 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
इगतपुरी पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): sarika vithaal ahirra

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 11



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with CamScanner